केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय तेलबिया व तेलताड अभियानांतर्गत लघु अभियान-१ (तेलबिया) या योजनेकरिता सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता केंद्र शासनाकडून प्राप्त निधी वितरीत करणेबाबत.
**(लेखाशिर्ष २४०१ A४८६)**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१७ / प्र. क्र.११ / कार्यासन.६**
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ०५ फेब्रुवारी, २०१८.

<u>वाचा -</u>

१) वि, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७ /प्र.क्र.६८ / अर्थ-३, दि. ०१.०४.२०१७.
२) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.७५ / अर्थ-३, दि. १८.०४.२०१७.
३) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.९४ / अर्थ-३, दि. ३०.०६.२०१७
४) केंद्र शासन, कृषि आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाचे पत्र क्रमांक १४-१/२०१७-सीअे-II, दिनांक १६ नोव्हेंबर, २०१७.
५) कृषि व पदुम विभागाची नस्ती क्र. रागत-१२१८ / प्र. क्र. १०/ (भाग-२) /४-अे.

**शासन निर्णय-**

राज्यात केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय तेलबिया व तेलताड अभियान राबविण्यात येत असून त्याअंतर्गत लघु अभियान-१ ( तेलबिया ) मागणी क्र. टी-५, २४०१ पीक संवर्धन, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) (१४) कृषि उन्नती योजना -राष्ट्रीय तेलबिया व पामतेल अभियान (लघु अभियान-१) ( तेलबिया ) (२४०१ A४८६), ३३ अर्थसहाय्य या योजनेंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता रु. ६००.८ लाख इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे.

कृषि व पदुम विभागाच्या वाचा क्र. ५ येथील प्रस्तावास अनुसरुन मागणी क्र. टी-५, २४०१ पीक संवर्धन, ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) (१४) कृषि उन्नती योजना- राष्ट्रीय तेलबिया व पामतेल अभियान (लघु अभियान-१) ( तेलबिया) ( २४०१ A४८६), ३३ अर्थसहाय्य या योजनेकरिता केंद्र शासनाकडून प्राप्त रु. ५२.१२२ लाख इतका निधी ( अक्षरी रुपये बावन्न लाख बारा हजार दोनशे फक्त ) प्रशासकीय विभाग / नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान सचिव, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (BEAMS ) वितरीत करण्यास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरीत करण्यात आला आहे. नियंत्रण अधिकारी / विभागप्रमुख यांनी खर्चासंबंधीच्या सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखडयानुसार याच वर्षात सदर निधी खर्च होईल याची दक्षता घ्यावी. तसेच उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्षनिहाय / उपलेखाशिर्षनिहाय तसेच साध्य झालेले भौतिक उद्दिष्टनिहाय माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र, संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक; संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास; आदिवासी विकास विभाग व कृषि व पदुम विभाग यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवणेबाबत सूचना देण्यात यावी.

३. नियंत्रण अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात / अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची दक्षता

घ्यावी. जेणेकरुन शासनाला आदिवासी क्षेत्रातील व उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर होणा-या खर्चावर लक्ष ठेवता येईल.

४. उपरोक्त योजनेंतर्गत समरुप राज्य हिस्सा लेखाशिर्ष (०१) (१५) कृषि उन्नती योजना-राष्ट्रीय तेलबिया व तेलताड (लघु अभियान-३), २४०१ एे४९५ खालील निधी जिल्हा स्तरावर वितरीत करण्यात आलेला आहे.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या **वाचा** क्र.१ व क्र. २ अन्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये तसेच अनौपचारिक संदर्भ क्र. १२ /अर्थोपाय, दि. १०-०१-२०१८ अन्वये दिलेल्या मंजूरीस अधिन राहून निर्गमित करण्यात येत असून वरील शासन निर्णयातील अटींची पुर्तता होत असल्याची कृषि व पदुम विभागाने खात्री करावी.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०२०५१११९३१७१२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: cn=Ravindra Digambarrao Aute, o=Tribal Development Department, ou=Government of Maharashtra, email=rajendra.aute@nic.in, c=IN
Date: 2018.02.05 11:39:18 +05'30'

(रविंद्र दि. औटे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रत,**

१. प्रधान सचिव (कृषि) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य.
३. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
४. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक / नागपूर / ठाणे / अमरावती.
५. वित्त विभाग (अर्थसंकल्प- १९), मंत्रालय, मुंबई.
६. कृषि व पदुम विभाग मंत्रालय, मुंबई.
७. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा मजला, विधानभवन, मुंबई.
८. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
९. कार्यासन क्र. २ व ९, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
१०. निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग.